॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३३५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* **सुविचार** *

सर्व साधारण व्यक्ती सुप्त मेंदूचा केवळ १० टक्केच वापर करतो.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### होर्मुझ

आशियाई संघर्षापुढे
आपण हतबल किती
ऊर्जेची गरज मोठी पण
कायम अंधाराचीच भिती

जागतिक अर्थव्यवस्था
एका बंदरावर ठप्प आहे
कितीही दाबले नाक तरी
तोंड सगळ्यांचेच गप्प आहे

वीरभूमी

## SPOT NEWS

### अमेरिका-इराण चर्चेच्या दुसऱ्या फेरीसाठी तयार

● **इस्लामाबाद** – पश्चिम आशियात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका-इराण संघर्ष निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या युद्धविरामाची मुदत संपत आली असताना दोन्ही देशांमध्ये पुन्हा शांतता चर्चेची हालचाल सुरू झाली आहे. दरम्यान, इराणने प्रस्तावित करार नाकारल्यास इराणच्या अणुप्रकल्पांसह सर्वच ऊर्जा प्रकल्प नष्ट करण्याचा इशारा अमेरिकेने दिला तर त्याला प्रत्युत्तर देण्याची तयारीही इराणने केली आहे. त्यामुळे हा संघर्ष थांबणार की चिघळणार, हे चर्चेनंतरच स्पष्ट होणार आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेने इस्लामाबाद येथे दुसऱ्या फेरीच्या चर्चेसाठी प्रतिनिधीमंडळ पाठविले असून विशेष दूत स्टीव विटकॉफ यांच्या नेतृत्वाखाली ही चर्चा होणार आहे.

### पंढरपुरात श्री रुक्मिणी मातेस अलंकार परिधान

● **पंढरपूर** – हिंदू वर्षातील महत्वाचे साडेतीन मुहुर्तापैकी अक्षय तृतीया एक मुहूर्त आहे. हिंदू धर्मात या सणाला विशेष महत्त्व असते. त्यानिमित्ताने पंढरपुरातील श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली. यामध्ये श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंच पेटी तांबडी, जव मणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोळ, सरी, कंबर पट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले.

# डेंग्यूविरुद्धच्या लसीला मंजुरी

## भारतात ४ ते ६० वयोगटातील व्यक्तींना देता येणार डोस

● **नवी दिल्ली । वीरभूमी** –
देशात दरवर्षी पावसाळ्यात डेंग्यूचे संकट अक्राळविक्राळ रूप धारण करते. डेंग्यूचा वाढता धोका लक्षात घेता आरोग्य क्षेत्रातून अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली असून डेंग्यूवरील पहिल्या लसीला म्हणजेच टीएके-००३ अर्थात (क्युडेन्गा) ला भारत सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. औषध महानियंत्रकांच्या तज्ज्ञ समितीने ४ ते ६० वयोगटातील लोकांसाठी ही लस सुरक्षित असल्याचे मानले आहे.

जपानच्या टाकेडा फार्मास्युटिकल्स कंपनीने विकसित केलेली ही लस अत्यंत प्रभावी मानली जात आहे. या लसीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, एखाद्या व्यक्तीला पूर्वी डेंग्यू होऊन गेला आहे किंवा नाही, याची कोणतीही तपासणी न करता ही लस देता येते. डेंग्यूच्या चारही प्रकारच्या विषाणूंपासून संरक्षण देण्याची क्षमता क्युडेन्गा लसीमध्ये आहे. क्लिनिकल ट्रायल्समध्ये असे दिसून आले आहे की, ही लस चार वर्षांहून अधिक काळ संरक्षण



देऊ शकते. सरकारी आकडेवारीनुसार, २०२० मध्ये ४४ हजार असलेले डेंग्यूचे रुग्ण २०२३ व २०२४ या दोन वर्षात २.३ लाखांच्या पार गेले आहेत; तर गेल्या वर्षी सव्वा लाख रुग्ण सापडले होते.

तथापि, तज्ज्ञ असेही मानतात की, ही लस म्हणजे जादुई समाधान नाही. लस डेंग्यूचा धोका नक्कीच कमी करेल. परंतु तो पूर्णपणे नष्ट करू शकत नाही. डेंग्यूची तीव्रता अनेकदा शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवर अवलंबून असते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, लस उपलब्ध झाली असली तरी डासांपासून होणारा संसर्ग रोखण्यासाठी स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे तितकेच आवश्यक आहे. लसीमुळे डेंग्यूची तीव्रता आणि रुग्णालयात दाखल होण्याचे प्रमाण नक्कीच कमी होईल, मात्र डासांची उत्पत्ती रोखणे आणि वेळेवर उपचार घेणे हाच डेंग्यु मुक्तीचा खरा मंत्र ठरणार आहे.

### दोन डोसमध्ये मिळणार सुरक्षा

■ ही लस दोन डोसमध्ये दिली जाणार असून त्यामध्ये तीन महिन्यांचे अंतर असणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही ज्या भागात डेंग्यूचा प्रादुर्भाव जास्त आहे, तिथे या लसीचा वापर उपयुक्त असल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे या लसीचे उत्पादन हैदराबादमधील बायोलॉजिकल ई. लिमिटेडच्या माध्यमातून भारतातच केले जाणार आहे. यामुळे भविष्यात ही लस माफक दरात आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

## अक्षय्य तृतीयेनिमित्ताने ‘दगडूशेठ’ गणपती बाप्पाला आंब्यांचा महाभोग



● **पुणे । वीरभूमी** –
अक्षय्य तृतीयेनिमित्त पुण्यातील दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांचा महाभोग दाखवण्यात आला. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्य तृतीयेच्या मंगलदिनी दरवर्षी हा महानैवेद्य बाप्पाला दाखवला जातो. याच दिवशी गणरायाचे दर्शन व्हावे, याकरिता भाविकांनी पहाटेपासून मंदिरात रांगा लावल्या होत्या.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यामध्ये गणपती बाप्पांना ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. पुण्यातील आंब्यांचे सुप्रसिद्ध व्यापारी देसाई आंबेवालेचे संचालक मंदार देसाई व कुटुंबीयांच्या वतीने हा नैवेद्य दाखवण्यात आला.

मंदिरात रविवारी पहाटे तीन वाजता ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेक झाला. त्यानंतर पहाटे ४ वाजता गायिका विदुषी मंजुषा पाटील यांनी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण केली. सकाळी ८ वाजता गणेशयाग देखील झाला. आंब्याचा प्रसाद ससूनमधील रुग्णांना, श्रीवत्समधील मुलांना तसेच वृद्धाश्रम व दिव्यांग मुलांच्या संस्था व मंदिरात भाविकांना देण्यात येणार आहे.

## जनगणनेसाठी आवश्यक घरांचे गट व सीमांकन करण्याचे काम वेळेत पूर्ण करा : जिल्हाधिकारी

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
आगामी जनगणनेच्या अनुषंगाने सुरू असलेले घरयादी गट निश्चितीचे आणि नकाशांचे काम दिलेल्या मुदतीत पूर्ण करावे. या राष्ट्रीय महत्त्वाच्या कामात योग्य ती दक्षता घेऊन ते विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातून दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी आणि जनगणनेचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी तालुका आणि नगरपरिषदनिहाय कामाचा सविस्तर आढावा घेतला. ज्या तालुक्यांचे व शहरांचे काम संथ गतीने सुरू आहे, त्यांनी सुटीच्या दिवशीही काम सुरू ठेवून २० एप्रिलच्या आत ते पूर्ण करावे, असे त्यांनी सांगितले. बैठकीस अनुपस्थित राहणाऱ्या आणि कामात पुरेशी प्रगती न दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांनी कामकाजात तातडीने सुधारणा करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

जनगणनेसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या प्रगणक आणि पर्यवेक्षकांची माहिती सीएमएमएस पोर्टलवर सोमवार सकाळपर्यंत अद्ययावत करण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. ही माहिती भरताना जे कर्मचारी लवकरच सेवानिवृत्त होणार आहेत किंवा जे वैद्यकीय रजेवर आहेत, त्यांची नावे वगळण्याची दक्षता घ्यावी. पोर्टलवरील माहिती एकदा अंतिम केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. त्यामुळे सर्व तहसीलदार आणि मुख्याधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून या माहितीची अचूकता तपासावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जनगणनेचे अधिकारी श्रीकांत बनकर यांनी पुढील प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. पर्यवेक्षकीय मंडळ तयार करताना एका प्रगणकाला साधारणपणे आठशे ते नऊशे लोकसंख्येचे समान काम दिले जाईल, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच, प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण २३ एप्रिलपासून सुरू होणार असून, प्रशिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी दोन तुकड्या एकत्र न करता, प्रत्येक तुकडीचे स्वतंत्र प्रशिक्षण घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. नियुक्तीपत्रे आणि ओळखपत्रे प्रशिक्षणापूर्वीच वितरित करण्यात यावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## सोशल मीडियावरील बेकायदेशीर मजकुरावर निवडणूक आयोगाची कारवाई

● **मुंबई । वीरभूमी** –
देशातील सार्वत्रिक निवडणुका व पोटनिवडणुका २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील बेकायदेशीर व दिशाभूल करणाऱ्या मजकुराविरुद्ध कडक भूमिका घेतली आहे. सर्व संबंधितांनी सोशल मीडियाचा जबाबदारीने व नैतिकतेने वापर करावा, असे आयोगाने सांगितले आहे.

माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २०००, आयटी नियम २०२१ आणि आचारसंहितेच्या तरतुदींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) साहाय्याने तयार केलेला किंवा फेरफार केलेला कोणताही भ्रामक अथवा बेकायदेशीर मजकूर निदर्शनास आल्यानंतर संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मनी ३ तासांच्या आत कारवाई करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रचार प्रतिनिधींनी प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या एआय आधारित किंवा डिजिटलरीत्या बदललेल्या मजकुरावर AI-Generated, Digitally Enhanced किंवा Synthetic Content अशी स्पष्ट नोंद करणे आवश्यक असून, त्या मजकुराच्या मूळ स्रोताची माहिती देणेही बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास टिकवण्यास मदत होईल, असे आयोगाने नमूद केले आहे. १५ मार्च २०२६ रोजी निवडणुकांची घोषणा झाल्यापासून आतापर्यंत अशा ११ हजारांहून अधिक सोशल मीडिया पोस्ट्स/ णठङ ओळखून त्यावर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये मजकूर हटविणे, गुन्हे नोंदविणे (FIR), स्पष्टीकरणे आणि खंडन जारी करणे अशा उपाययोजनांचा समावेश आहे. याशिवाय, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ मधील कलम १२६ अंतर्गत मतदान संपण्यापूर्वीच्या ४८ तासांच्या शांतता कालावधीत कोणत्याही प्रकारचे निवडणूक प्रचार साहित्य प्रसारित करण्यास बंदी असल्याची तरतूदही आयोगाने पुन्हा अधोरेखित केली आहे. दूरदर्शन, रेडिओ, मुद्रित माध्यमे तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्मनी या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. दरम्यान, नागरिक, राजकीय पक्ष आणि उमेदवारांना आचारसंहिता भंगाच्या तक्रारी नोंदविण्यासाठी ECINET वरील C-Vigil ॲपचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


# अक्षय तृतीया पूर्वसंध्येला कोपरगावात दोन बालविवाह रोखले

## स्नेहालय ‘उडान’ प्रकल्पाच्या समन्वयातून तात्काळ कारवाई । माहिती द्या, एक आयुष्य वाचवा आवाहन

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –
जिल्ह्यात बालविवाहाच्या घटनांबाबत सातत्याने वृत्त समोर येत असले तरी त्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे वाढलेली जनजागृती असल्याचे दिसून येत आहे. बालविवाहाचे दुष्परिणाम लक्षात घेऊन नागरिकांकडून हेल्पलाईनवर माहिती दिली जात असून त्यामुळे अनेक प्रकरणे वेळेत उघडकीस येत आहेत.

याच पार्श्वभूमीवर अक्षय तृतीया पूर्वसंध्येला कोपरगाव तालुक्यात एकाच दिवशी दोन अल्पवयीन मुलींचे होणारे बालविवाह रोखण्यात यश आले. साटा-लोटा पद्धतीने हे विवाह आयोजित करण्यात आले होते. स्नेहालय संचलित ‘उडान’ प्रकल्पाला माहिती मिळताच संबंधित यंत्रणांशी तात्काळ समन्वय साधण्यात आला.

उडान प्रकल्पाच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसेवक (बालविवाह प्रतिबंधक अधिकारी), पोलीस पाटील व स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी हस्तक्षेप करून दोन्ही विवाह थांबवले. कुटुंबीयांना समुपदेशन करून बालविवाहाचे कायदेशीर परिणाम तसेच मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि भवितव्यावर होणारे दुष्परिणाम



समजावून सांगण्यात आले. दोन्ही कुटुंबांचे लेखी जबाब नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण बाल कल्याण समितीसमोर हजर राहण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.

स्नेहालय ‘उडान’ प्रकल्प गेल्या सात वर्षांपासून अक्षय तृतीया काळात विशेष सतर्कता ठेवून कार्यरत असून, बालविवाहाची माहिती मिळताच तात्काळ हस्तक्षेप केला जातो. तसेच मागील २० वर्षांपासून चाईल्ड हेल्पलाईन १०९८ च्या माध्यमातूनही संस्थेने मोठ्या प्रमाणात बालविवाह रोखण्यात यश मिळवले आहे.

बालविवाह हा बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६, पॉक्सो कायदा आणि भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गंभीर गुन्हा आहे. यात सहभागी होणारे पालक, नातेवाईक, विवाह लावणारे तसेच मदत करणारे सर्वजण आरोपी ठरू शकतात. त्यामुळे परंपरा किंवा भावना या नावाखाली बालविवाह करणे कायद्याने मान्य नाही.

या घटनेतून वेळेत मिळालेली माहिती दोन मुलींचे आयुष्य वाचवू शकते, हे अधोरेखित झाले आहे. त्यामुळे कुठेही बालविवाह होत असल्याची शंका आल्यास नागरिकांनी ती तात्काळ कळवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी चाईल्ड हेल्पलाईन: १०९८ आणि उडान हेल्पलाईन: ९०११०२६४९५ असे दोन क्रमांक असून तुमचा एक फोन एखाद्या मुलीचे संपूर्ण आयुष्य वाचवू शकतो.

# SPOT NEWS

## संजय कांबळे यांना 'महाराष्ट्र रत्न' पुरस्कार जाहीर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते संजय कांबळे यांना तेजस सेवा प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक, धार्मिक आणि बौद्ध धम्म प्रसाराच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात येत आहे. संगमनेर येथे ६ जून रोजी आयोजित संविधान अमृत महोत्सव कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रविंद्र घोसाळे यांनी दिली. संजय कांबळे हे गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून, आंबेडकरी चळवळीला बळकटी देण्यासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. अत्यंत सामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या कांबळे यांनी समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांना आधार देण्याचे कार्य केले आहे. त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात भारिप बहुजन महासंघाच्या माध्यमातून केली. यानंतर दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून श्रामनेर शिबिरांचे आयोजन करून युवक–युवतींना योग्य दिशा देण्याचे काम त्यांनी हाती घेतले. बाल शिबिर, महिला शिबिर, समता सैनिक शिबिर, धम्म मेळावे व धम्म परिषदांचे आयोजन करून जिल्ह्यातील बौद्ध धम्म चळवळीला त्यांनी चालना दिली आहे. तसेच तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या माध्यमातून अनेक गरीब मुला–मुलींचे विवाह लावून देण्याचे तसेच तरुण–तरुणींसाठी निशुल्क विवाह जुळविण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले आहे. समाजोपयोगी उपक्रमांतून त्यांनी अनेक कुटुंबांना आधार दिला आहे. धम्माच्या प्रचार–प्रसारासाठी त्यांनी धम्म रथ तयार करून जिल्हाभर जनजागृती सुरू केली आहे. याशिवाय रमाई महिला मंडळाच्या माध्यमातून शववाहिका उपलब्ध करून देण्यात आली असून, तिचा संपूर्ण खर्च मंडळ उचलत आहे, हीदेखील एक उल्लेखनीय सामाजिक सेवा ठरली आहे. विशेष म्हणजे, २०२५ पासून त्यांनी साडेसहा फुट उंचीच्या पाच बुद्धमूर्ती दान केल्या असून, भविष्यात १०० बुद्धमूर्ती दान करण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. त्यांच्या या सर्वसमावेशक कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. यापूर्वीही विविध सामाजिक आणि धार्मिक संस्थांकडून त्यांचा गौरव करण्यात आला असून, हा राज्यस्तरीय सन्मान त्यांच्या कार्याची पावती आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## सावेडीत म. फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सवात विचारांचा जागर

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास हा केवळ एका व्यक्तीचा संघर्ष नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठीचा लढा होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण घेतले, परदेशात जाऊन उच्च पदव्या मिळवल्या आणि भारताच्या संविधानाची निर्मिती करून देशाला नवा मार्ग दाखविल्याचे प्रतिपादन पाटबंधारे मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक राजेंद्र आंधळे यांनी केले. सावेडी, गुलमोहर रोड येथील आम्रपाली मंगल कार्यालयात महात्मा ज्योतीबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रा. निवृत्ती आरु, संपर्क प्रमुख सुधाकर जाधव, स्वागताध्यक्ष एन. एम. पवळे, सचिव सी. पी. क्षेत्रे, उपाध्यक्ष पी. पी. खंडागळे, शिरीष जाधव, सहसचिव बी. आर. सातपुते, गिरीष गायकवाड, भिमराव घोडके, राजेंद्र थोरात, डॉ. प्रताप घोडके, इंजि. निखिल आरु, डॉ. अमित पवळे, इंजि. किरण पगारे, अजय साळवे, डॉ. तुरुकमाने, डॉ. बी. एन. रणनवरे, के. के. जाधव, मार्शल भिंगारदिवे, मनोहर पाटोळे, संजय शिंदे, डॉ. शैलेश खंडागळे, रमेश जगताप, अर्जुन कांबळे, राजु थोरात, विजय पाटोळे आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगरची आधुनिक वैद्यकीय सेवेकडे वेगाने वाटचाल

**भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील । आधुनिक वैद्यकीय सुविधेमुळे जिल्ह्यातील रुग्णांना दिलासा**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील साताळकर लोटस रुग्णालयात अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू करण्यात आल्याने आरोग्य क्षेत्रात नवा अध्याय सुरू झाला आहे. रोबोटच्या सहाय्याने शस्त्रक्रिया करणारी सुविधा उपलब्ध करून देणारे हे शहरातील पहिलेच रुग्णालय ठरले असून, यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा आता स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार आहे.

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पार पडलेल्या उद्घाटन सोहळ्यास भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, नगर शहराचे आमदार संग्राम भैय्या जगताप, हरिभक्त परायण आदिनाथ महाराज शास्त्री, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. सातारकर, तसेच रुग्णालयातील डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगरसारख्या शहरात रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे रुग्णांना मोठ्या शहरांत जाऊन उपचार घेण्याची गरज कमी होणार असून वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होईल. साताळकर लोटस रुग्णालयाने आधुनिक वैद्यकीय सेवेत नवा मापदंड निर्माण केला असून, ही सुविधा भविष्यातील आरोग्यसेवेचा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, ही सुविधा केवळ एका रुग्णालयापुरती मर्यादित नसून संपूर्ण शहराच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नागरिकांना दर्जेदार व सुरक्षित उपचार सेवा आपल्या शहरातच उपलब्ध होत आहे, ही अभिमानाची बाब आहे.

कार्यक्रमात डॉ. तनवर यांनी रोबोटिक शस्त्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, रोबोट हा डॉक्टरचा पर्याय नसून अत्याधुनिक सहाय्यक आहे. डॉक्टरच्या नियंत्रणाखाली तो अधिक अचूक, स्थिर आणि सूक्ष्म हालचाली करतो, ज्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित व प्रभावी होते. यामुळे रुग्णांना कमी वेदना होतात, रक्तस्राव कमी होतो आणि रुग्ण लवकर बरे होतात.

या प्रसंगी डॉ. सतीश सोनवणे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती सानप मॅडम, नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे यांच्यासह विविध मान्यवर, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राहुरी पोटनिवडणुकीपूर्वी पोलिसांचा मिरी, तिसगाव व करंजी गावांत रूट मार्च



**● पाथर्डी । वीरभूमी –**

राहुरी– नगर– पाथर्डी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकाली निधनानंतर होणाऱ्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी पाथर्डी पोलिसांकडून मिरी, तिसगाव आणि करंजी या गावांमध्ये रूट मार्च काढण्यात आला.

रविवार, दि. १९ एप्रिल रोजी सकाळी विविध वेळांत हा मार्च पार पडला. सकाळी ८.४५ ते ९.२० दरम्यान मिरी गावात, १०.०० ते १०.२५ दरम्यान तिसगाव येथे तसेच १०.४० ते ११.०० वाजेच्या सुमारास करंजी येथे पोलिसांनी संचलन करत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा संदेश दिला.

या रूट मार्चचे आयोजन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव (अहिल्यानगर) तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू (शेवगाव उपविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या संचलनात उखडऋ्चे एएसआय बी. सी. भिल यांच्यासह २५ जवान, उठझऋ्चे प्रवीण कुमार यांच्यासह १५ जवान, पाथर्डी पोलीस ठाण्याचे ५ अधिकारी, २० पोलीस अंमलदार तसेच १५ होमगार्ड सहभागी झाले होते.

पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या रूट मार्चद्वारे नागरिकांना शांतता राखण्याचे तसेच निर्भयपणे मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

## संघर्षातून स्वावलंबनाकडे; अकोलेतील एकल महिलेला लॉन्ड्री व्यवसायाची नवी दिशा

**समर्थ संस्था व व्ही.पी. फूड्सच्या पुढाकारातून अफसाना सय्यद यांना उभारी**

**● अकोले । वीरभूमी–**

तीन वर्षांपूर्वी पतीचे निधन, उराशी दोन मुले, कर्जाचा डोंगर आणि तोट्यात गेलेला फळांचा व्यवसाय अशा बिकट परिस्थितीतही हार न मानता स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या अफसाना जावेद सय्यद यांना अखेर स्वावलंबनाची नवी दिशा मिळाली आहे. अकोले येथील समर्थ संस्थेच्या माध्यमातून तसेच 'कँडी मॅन' स्वर्गीय विठ्ठल पाडेकर यांच्या स्मरणार्थ या एकल महिलेला लॉन्ड्री व्यवसायासाठी दुकान उभे करून देण्यात आले आहे. त्यामुळे अफसाना यांचे आत्मनिर्भरतेकडे एक भक्कम पाऊल पडले आहे.



> समाजातील गरजू, विशेषतः एकल महिलांना आत्मनिर्भर बनवणे ही आमची जबाबदारी आहे. या माध्यमातून त्यांना आर्थिक स्वावलंबन मिळावे, हा आमचा प्रयत्न आहे. भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येतील.
>
> **– राजेश पाडेकर** व
> **– ऋषिकेश पाडेकर,** व्ही.पी. फूड्स

अफसाना सय्यद या गेल्या तीन वर्षांपासून कठीण परिस्थितीत संघर्ष करत होत्या. त्यांच्या पतीच्या निधनानंतर समर्थ संस्थेच्या 'रविवारची शाळा' उपक्रमांतर्गत त्यांच्या दोन मुलांचे शिक्षणासाठी पालकत्व स्वीकारण्यात आले. त्यांच्या परिस्थितीची दखल घेत संस्थेने त्यांना मदत करण्यास सुरुवात केली.

समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने व्ही. पी. फूड्स या उद्योगानेही सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांतर्गत पुढाकार घेतला. या अंतर्गत अफसाना सय्यद यांना लॉन्ड्री व इस्त्री व्यवसायासाठी आवश्यक सर्व साहित्य आणि दुकान उभारून देण्यात आले. कंपनीकडून इस्त्री मशीन, कपडे धुण्याचे साहित्य, फर्निचर तसेच इतर आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमामुळे अफसाना यांना स्थिर उत्पन्नाचा स्रोत मिळाला असून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाला मोठा हातभार लागणार आहे. दरम्यान, स्वर्गीय 'कँडी मॅन' विठ्ठल पाडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्ही.पी. फूड्स येथे छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बुवासाहेब नवले मल्टिस्टेटचे चेअरमन विक्रम नवले, अगस्ती कारखान्याचे माजी संचालक सुरेश गडाख, भाऊमामा खरात, राधाकिसन धुमाळ, किसन शेटे, निवृत्त शिक्षणाधिकारी उमेश डोंगरे, तसेच व्ही. पी. फूड्सच्या सुमनताई पाडेकर, राजेश पाडेकर, ऋषिकेश पाडेकर, नयना पाडेकर व शलाका पाडेकर आदी उपस्थित होते.

# किल्ले धर्मवीरगडावर 'हेरिटेज वॉक'ने वारसा संवर्धनाला नवी चालना

**अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचा उपक्रम । ५० हून अधिक सदस्यांचा सहभाग**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनच्या वतीने किल्ले धर्मवीरगड येथे 'हेरिटेज वॉक'चे आयोजन करण्यात आले. 'शिवदुर्गची १०१ मोहिम' अंतर्गत पार पडलेल्या या उपक्रमामुळे श्रीगोंदा तालुक्यात वारसा संवर्धनाचा नवा पायंडा पडत आहे.

सकाळी ७ ते १० या वेळेत पार पडलेल्या या हेरिटेज वॉकमध्ये दौंड, श्रीगोंदा व शिरूर तालुक्यातील सुमारे ५० सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ग्रामीण भागात प्रथमच अशा प्रकारचा उपक्रम राबविण्यात आल्याने त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.

वारसा संवर्धनासाठी पुढाकार घेताना शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे म्हणाले की, जसे नागरिक आरोग्यासाठी मॉर्निंग वॉक करतात, तसेच ऐतिहासिक वारसा जतनासाठी 'हेरिटेज वॉक' ही संकल्पना महत्त्वाची आहे. ग्रामीण भागात ही संकल्पना रुजविणे आव्हानात्मक असले तरी शिवदुर्गने त्यासाठी पुढाकार घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

या वॉकदरम्यान सहभागी सदस्यांनी पेडगाव परिसरातील विविध ऐतिहासिक स्थळांची माहिती घेतली. खंडोबाचा माळ, शंभूराजांच्या धिंडीचा परिसर, सरस्वती नदीवरील हत्तीमोट, भवानी मंदिर, भैरवनाथ मंदिर, शौर्यस्तंभ, रामेश्वर मंदिर, लक्ष्मी–नारायण मंदिर, मल्लिकार्जुन मंदिर, राजसदर, राजदरबार तसेच भीमा नदीचे पात्र आदी वारसा स्थळांची अभ्यासपूर्ण भटकंती घडवून आणण्यात आली.

राजेश इंगळे यांनी स्थळदर्शक स्मारकांबाबत संदर्भासह माहिती देत श्रीगोंद्याच्या इतिहासातील गहाळ पैलू उलगडून दाखवले. शिवव्याख्याते लक्ष्मण नाईकवाडी व मच्छिंद्र पंडित यांनीही मार्गदर्शन केले.



या उपक्रमात महिला व बालमावळ्यांचा लक्षणीय सहभाग होता. उपाध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कळमकर यांच्यासह तुषार चौधरी, चेतन चौधरी, अजित दळवी, अशोक गदादे, दिगंबर भुजबळ, अमोल बडे, जालिंदर पाडळे, ईश्वर कोठारे, रहीम हवालदार, संभाजी चौधरी, उत्तम कुलांगे, राकेश अग्रवाल, संतोष रोकडे, शितल गदादे, सुचित्रा दळवी, स्वाती मुळे, निरज पाडळे, आविष्कार इंगळे आदींनी सहभाग नोंदवला.

या 'हेरिटेज वॉक'मुळे श्रीगोंदा तालुक्यातील ऐतिहासिक वारसा जतन व संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास चालना मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# SPOT NEWS

## संत गोरोबा काका समाधी सोहळा उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील कुंभार गल्ली, नालेगाव येथे संत गोरोबा काका समाधी सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सोहळ्यात सहभाग नोंदविला. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबिर होय. स्थानिक नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच विविध कीर्तन, भजन व धार्मिक कार्यक्रमांमुळे वातावरण अधिकच भारावून गेले. कार्यक्रमास आ. संग्राम जगताप, पोनि. बाबासाहेब बोरसे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी जयकुमार सुसरे, राहुल देवतरसे, नितीन राजापूरे, अमित देवतरसे, अजिंक्य देवतरसे, सागर राजापूरे, राजू राजापूरे, अमोल राजापूरे, गोरख राजापूरे, राजेंद्र शिंदे, किरण कदम, युवराज देवतरसे, अतुल देवतरसे, अक्षय राजापूरे, अक्षय देवतरसे, अभिषेक देवतरसे, अथर्व मुकुटे, सार्थक दळवी, शुभम लोटके, शुभम मुकुटे, रोहित देवतरसे, आदित्य सुसरे, विनायक सुसरे, दुर्वेश रसाळ, पृथ्वीराज सुसरे, महेश बागले, स्वप्नील दळे, मयुरेश दळे, आशिष सुसरे, प्रमोद खार्गे, सुयोग राजापूरे, साहिल राजापूरे, सचिन राजापूरे, सार्थक राजापूरे, ओंकार राजापूरे, निखिल दुस्सा, अमोल चव्हाण, अनिल राजापूरे, अमोल वढझिरकर, भैय्या राजापूरे, संजय राजापूरे, किशोर वढझिरकर, पियुष शिरसे, अक्षय गोरे, सागर गोरे, देवतरसे सर, वाकचौरे सर, सुसरे सर, सागर देवतरसे, मयुर राजापूरे, प्रणव लाटणे, अमित टकले, भाऊसाहेब गोरे, किरण कुलकर्णी, सुरज शहाणे, प्रथमेश दळवी, कुणाल पाटील, अमित पाटील, मिलिंद देवगुणे, मयुर सांगळे, राजेंद्र शिरसाठ आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलचा १००% निकाल

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

पोदार इंटरनॅशनल स्कूलचा (CBSE) इयत्ता दहावीचा सन २०२५–२६ चा निकाल यावर्षीही शंभर टक्के लागला असून, मागील तीन वर्षांची यशस्वी परंपरा शाळेने कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. यंदा बिनिश मुगिसुद्दीन काझी हिने ९७.४०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. सई सुनील झावरे (९६.६०%) हिने द्वितीय, तर वेदांत संदीप झावरे (९६.४०%) याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच सिद्धी उरमुडे (९६.००%), ऐश्वर्या व्यास (९५.४०%), शर्वरी सांगळे (९४.८०%), अनुष्का कांकरिया (९४.४०%), श्लोका देवकर (९४.४०%), श्रावणी लाकूडझोडे (९४.२०%), ओम धस (९४.२०%), भावना कलाल (९४.००%), श्रुती चौधर (९३.८०%), विनय चेडे (९३.६०%), अथर्व बोठे (९३.२०%), श्रद्धा पवार (९२.८०%), अंजली जगताप (९१.४०%), रिचा बिहानी (९१.००%), तपस्या पवार (९०.४०%), आयुष देशमुख (९०.२०%), यश झरेकर (९०.२०%) आणि आकांक्षा भालसिंग (९०.००%) या विद्यार्थ्यांनी विशेष उल्लेखनीय यश संपादन केले.

# झाडू निर्मितीतून महिलांनी मिळवले स्वावलंबन

**उमेद अभियानामुळे बेलगावातील महिलांना आर्थिक बळ!**

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून बेलगाव येथील कष्टकरी महिलांनी झाडू निर्मितीचा व्यवसाय सुरू करून स्वावलंबनाचा मार्ग निवडला आहे. संघर्षावर मात करत या महिलांनी आपल्या संसाराला मोठे आर्थिक बळ दिले असून ग्रामीण भागातील इतर महिलांसाठी त्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे.

पूर्वी या महिलांना झाडू बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल कर्नाटकातून आणावा लागत असे. यात वाहतूक खर्चाचा मोठा बोजा पडायचा व भांडवलाअभावी कमी प्रमाणात माल खरेदी केल्याने नफा मर्यादित राहायचा. अशा संघर्षमय परिस्थितीत समुदाय संसाधन व्यक्ती अनिता जाधव यांनी



केलेल्या मार्गदर्शनामुळे महिलांना उमेद अभियानाची माहिती मिळाली. यानंतर महिलांनी एकत्र येत लक्ष्मी व येडेश्वरी स्वयंसहायता गटांची स्थापना केली. येथून त्यांच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने एक नवी दिशा मिळाली.

व्यवसाय वाढवण्यासाठी गटांना बँकेकडून एक लाख व तीन लाखांचे कर्ज उपलब्ध झाले. तसेच ग्रामसंघातून मिळालेल्या समुदाय गुंतवणूक निधीमुळे त्यांच्या स्वप्नांना बळ मिळाले. यातून पुढे अण्णा भाऊ साठे झाडू उत्पादक गट स्थापन करण्यात आला. या गटाला मिळालेल्या दोन लाखांच्या निधीतून व्यवसायाला मोठी गती मिळाली. आता या महिला मोठ्या प्रमाणावर कच्चा माल खरेदी करत असून यंत्रसामग्रीच्या साहाय्याने त्यांनी झाडू निर्मिती सुरू केली आहे.

यंत्राच्या वापरामुळे आता कमी वेळेत अधिक झाडू तयार होत असून महिला आपल्या कुटुंबाच्या सर्व आर्थिक गरजा यशस्वीपणे भागवत आहेत. केवळ झाडू तयार न करता त्यांनी आपल्या आयुष्याची नवी वाट तयार केली असून त्यांच्या कष्टाला व जिद्दीला आता यशाची जोड मिळाली आहे. या संपूर्ण उपक्रमाला गटविकास अधिकारी सोनल शहा, प्रकल्प संचालक तथा जिल्हा अभियान सहसंचालक मंजूषा ठवकर, तालुका अभियान व्यवस्थापक फिरोज सय्यद व प्रभाग समन्वयक रूपाली झारगड यांचे मार्गदर्शन लाभले.

## शंभर टक्के मतदानासाठी राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृती

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे यासाठी जिल्हा स्वीप समितीच्या वतीने २३ एप्रिलचा लोकशाही जागर हा व्यापक जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. मतदानाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करून निर्भय, निष्पक्ष व सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे आवाहन स्वीप समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड यांच्या संकल्पनेतून दि. १८ ते २२ एप्रिल या कालावधीत राहुरी विधानसभा मतदारसंघातील शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, महिला बचत गट तसेच आशा स्वयंसेविका यांच्या माध्यमातून विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत दि. १८ एप्रिल रोजी मतदानाची शपथ दिली जाणार असून, १९ एप्रिल रोजी मतदान जनजागृतीसाठी डीपी स्टेटस ठेवणे, २० एप्रिल रोजी प्रसिद्ध व्यक्तींचे जनजागृतीपर व्हिडिओ प्रसारित करणे आणि २१ एप्रिल रोजी सोशल मीडियाच्या माध्यमातून निर्भय मतदानासाठी आवाहन करणे इत्यादी उपक्रम राबविले जाणार आहेत. तसेच २२ एप्रिल रोजी मतदानाची तारीख, वेळ व आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती देण्यात येणार आहे.

यावेळी नागरिकांना आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण निवडणुकीचे पावित्र्य राखू तसेच कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता निर्भयपणे मतदान करू अशी शपथ देण्यात येत आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त मतदारांनी २३ एप्रिल रोजी मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) आकाश दरेकर, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) मीना शिवगुंडे, मतदारदूत डॉ. अमोल बागूल तसेच स्वीप समितीच्या इतर सदस्यांनी केले आहे.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन फ्री पास; दीर्घ लढ्याला अखेर यश

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना आजीवन मोफत प्रवासाचा पास मिळावा, या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला अखेर यश मिळाले असून, एसटी महामंडळाने ही मागणी मान्य केली आहे. सेवानिवृत्त एसटी कर्मचारी संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याने राज्यभरातील हजारो कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर विभागाच्या वतीने जेऊर बायजाबाई (ता. नगर) येथे विजयी मेळावा उत्साहात पार पडला. संघटनेचे केंद्रीय सदस्य बलभीम कुबडे यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्यात कार्याध्यक्ष अर्जुनराव बकरे, राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभीम कुबडे यांचा अभिनंदन ठराव मांडण्यात आला. या ठरावाला गोरख बेळगे यांनी अनुमोदन दिले.



उपस्थित सदस्यांनी

राज्यस्तरीय पदाधिकारी व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य यांचे अभिनंदन ठराव टाळ्यांच्या कडकडाटात एकमताने मंजूर केला. यावेळी बोलताना बलभीम कुबडे यांनी सांगितले की, संघटनेच्या एकजुटीच्या बळावर आणि सभासदांच्या ताकदीवर हा लढा यशस्वी झाला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर पूर्ण झाली असून, यामुळे राज्यातील सुमारे ४६ हजार सेवानिवृत्त एसटी कर्मचारी, त्यांचे पती–पत्नी तसेच विधवा महिलांना वर्षभर मोफत एसटी प्रवासाचा लाभ मिळणार आहे.

या प्रसंगी ज्ञानदेव अकोलकर, शिवाजी कडूस, अरुण दळवी यांनी संघटनेच्या कामकाजावर विश्वास व्यक्त करत कामगारांच्या प्रश्नांसाठी आवश्यक तेव्हा आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचे आश्वासन दिले. मेळाव्यात संघटनेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर कोतकर यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मगर, माजी विभागीय वाहतूक अधिकारी बाळासाहेब चव्हाण, भाऊसाहेब तोडमल तसेच जेऊर येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विठ्ठल देवकर यांनी आभार मानले.

# वनकुटे ग्रामपंचायतीतील गैरव्यवहार प्रकरणात कारवाईची मागणी

**चौकशी अहवालांतील विसंगतींवर प्रश्नचिन्ह | फेरचौकशी न झाल्यास उपोषण**

**पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यातील वनकुटे ग्रामपंचायतीतील कथित लाखो रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. तसेच चौकशी अहवालांमधील गंभीर विसंगतींकडे लक्ष वेधत जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे.

ग्रामस्थ संतोष बबन केदारी व सुरेश सिताराम गागरे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, या प्रकरणात १४ ऑक्टोबर २०२५ व ७ एप्रिल २०२६ रोजी दोन स्वतंत्र चौकशी अहवाल सादर करण्यात आले. मात्र, या दोन्ही अहवालांमध्ये परस्परविरोधी निष्कर्ष नोंदवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. पहिल्या अहवालात ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणीसाठी बाहेर नेण्यात आल्याचे नमूद असताना, दुसऱ्या अहवालात संबंधित नोंदी व ठराव उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे चौकशी प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अर्जदारांच्या मते, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी पदाचा गैरवापर करून लाखो रुपयांचा अपव्यय केला आहे. यासंदर्भातील पुरावे सादर करूनही चौकशी अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ग्रामसभा व मासिक सभांच्या नोंदी अपूर्ण असतानाही त्या पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. काही विषय ग्रामसभेत न घेता नोंदीत समाविष्ट केल्याचाही आरोप अर्जात करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित चौकशी अधिकाऱ्यांवर ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक फेरचौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच, चौकशी पूर्ण होईपर्यंत वनकुटे ग्रामपंचायतीची कोणतीही देयके अदा करू नयेत, नवीन कामांना मंजुरी देऊ नये आणि कर्मचारी भरती प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी ८ दिवसांत योग्य ती कारवाई करून फेरचौकशीचे आदेश न दिल्यास त्यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा अर्जदारांनी दिला आहे. त्यामुळे या प्रकरणात प्रशासनाची पुढील भूमिका काय राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिक्षक हा समाज परिवर्तनाचा घटक

**अॅड. प्रताप ढाकणे | भिलवडे येथे मुख्याध्यापक अशोक कराड यांचा सेवापूर्ती निमित्त सत्कार**

**पाथर्डी । वीरभूमी–**

प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा भक्कम पाया असून समाजाच्या जडणघडणीत प्राथमिक शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून समाज परिवर्तनाचा मुख्य घटक आहे, असे प्रतिपादन एकलव्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अॅड. प्रताप ढाकणे यांनी केले.

तालुक्यातील भिलवडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अशोक कराड यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित निरोप समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीतज्ज्ञ अॅड. अंकुश गर्जे हे होते.

यावेळी ज्येष्ठ नेते भीमराव फुंदे, गोकुळ दौंड, गहिनीनाथ शिरसाठ, सरपंच सुरेश बडे, संजय बडे, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, अनिल भवर, निलेश शिरसागर, महंत रामगिरी महाराज, गणेश महाराज आदी



मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात रामनाथ कराड यांनी अशोक कराड यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीपासून ते त्यांच्या शैक्षणिक व सेवाकालातील उल्लेखनीय कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षस्थानावरून बोलताना अॅड. अंकुश गर्जे यांनी तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'कुसुमाग्रज वाचनालय' उपक्रमासाठी देणगी जाहीर केली.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक कैलास दौंड, स्मिता ढाकणे, अवनी ढाकणे, ज्योती तुपे आधाट, शिवाजी ढाकणे, ह.भ.प. रामगिरी महाराज, गणेश महाराज यांनी अशोक कराड यांच्या कार्याचा गौरव करून त्यांचे अभिनंदन केले. सत्काराला उत्तर देताना अशोक कराड यांनी आपल्या यशामागे कुटुंब, मित्रपरिवार आणि नातेवाईकांचा मोठा वाटा असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक देवकाते, सविता खेडकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व प्राथमिक शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी बाळासाहेब गोल्हार, राजेंद्र जायभाय, अमोल ढाकणे, महेंद्र शिरसाट, राजकुमार ढाकणे, अर्जुन शिरसाट, दिलीप बोरुडे, कल्याण लवांडे, शिक्षक बँकेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर शिरसाट, सुनिल शिरसाट, राजू गोल्हार, दीपक बडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरिफ बेग यांनी केले, तर आभार प्रदर्शन विश्वास पालवे यांनी केले.

# निझर्णेश्वर मंदिर देवस्थान संगमनेरातील प्रमुख पर्यटन केंद्र होणार

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील | श्रीक्षेत्र निझर्णेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ

**शिर्डी | वीरभूमी –** श्रीक्षेत्र निझर्णेश्वर मंदिराचा सुरू झालेला जीर्णोद्धार आणि परिसरात प्रस्तावित बिबट सफारी प्रकल्प यामुळे हे देवस्थान तालुक्यातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

श्रीक्षेत्र निझर्णेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धार कामाचा शुभारंभ पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आमदार अमोल खताळ, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे, वनविभागाचे अधिकारी अमरजित पवार, प्रवरा बँकेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थेटे, कैलास तांबे तसेच मंदिर विश्वस्त समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. मात्र या कामात लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. उपलब्ध करून दिलेल्या विकास निधीमुळे परिसराचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले असून, जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्यानंतर या तीर्थक्षेत्राची भव्यता अधिक वृद्धिंगत होईल.

तसेच, वनविभागाच्या जागेवर प्रस्तावित बिबट सफारी प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला असून, राजस्थानमधील व्याघ्र प्रकल्पांच्या धर्तीवर हा प्रकल्प राबविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या प्रकल्पामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ होऊन स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

आमदार श्री. खताळ म्हणाले, शासनाच्या माध्यमातून तालुक्यात विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे. या विकास प्रक्रियेत पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. देवस्थानांच्या विकासासाठी मिळणाऱ्या निधीमुळे तीर्थक्षेत्र पर्यटनाला गती मिळत असून, भविष्यात हा परिसर विकासाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# परिक्रमा पॉलिटेक्निकची वैष्णवी शेंडगे राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत २०० मीटर धावण्यात द्वितीय

**श्रीगोंदा | वीरभूमी –** इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे पुणे येथील समर्थ सणस मैदानावर आयोजित राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत परिक्रमा पॉलिटेक्निकच्या कु. वैष्णवी शेंडगे हिने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले.




या स्पर्धेत परिक्रमा तंत्रनिकेतनचे एकूण तीन खेळाडू सहभागी झाले होते. यामध्ये कु. वैष्णवी शेंडगे, कु. अविनाश गावडे व कु. अनुराधा धुमाळ यांचा समावेश होता. चुरशीच्या लढतीत या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल केले.

या यशाबद्दल परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक तथा माजी मंत्री बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ. प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ड. प्रतापसिंह पाचपुते, अकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, मुख्य अतिरिक्त कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अतिरिक्त अकॅडमी डायरेक्टर संजिव कदम यांच्यासह विविध विभागप्रमुखांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, इंजिनिअरिंग प्राचार्य मोहन धगाटे, एमबीए डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉ. पांडुरंग इथापे यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले.

या खेळाडूंना प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अशोक राहिंज यांचे मार्गदर्शन लाभले.

# महात्मा बसवेश्वर हेच महिला आरक्षणाचे प्रेरणास्रोत

## आ. मोनिका राजळे | पाथर्डीत 'महात्मा बसवेश्वर मार्ग' नामकरण; जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**पाथर्डी | वीरभूमी –** बाराव्या शतकात स्त्रियांना 'चूल आणि मुल' या चौकटीबाहेर जाऊ दिले जात नव्हते. अशा काळात महात्मा बसवेश्वर महाराजांनी स्त्रियांना धार्मिक कार्यासह राज्यकारभारातही सहभाग व आरक्षण दिले. त्यामुळे महिलांना समान संधी व हक्क देणारे तेच महिला आरक्षणाचे खरे प्रेरणास्रोत आहेत, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.



महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त पाथर्डी नगरपरिषदेच्या वतीने शहरातील एका मार्गाला महात्मा बसवेश्वर मार्ग असे नामकरण करण्यात आले. या नामफलकाचे उद्घाटन आमदार मोनिकाताई राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड व उपनगराध्यक्ष मंगलताई कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर नगर परिषद कार्यालयात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. राजळे म्हणाल्या की, बाराव्या शतकात वर्ण, वंश, उच्च-नीच भेदभाव आणि स्त्री-पुरुष असमानता पराकोटीला पोहोचली होती. अशा वेळी प्रवाहाच्या विरोधात जाऊन समानतेचे राज्य प्रस्थापित करणारे महात्मा बसवेश्वर महाराज यांचे कार्य आजही आदर्शवत ठरत आहे. त्यांनी पुढे नमूद केले की, अलीकडे संसदेमध्ये 'नारी शक्ती बिल' संमत होऊ शकले नाही; प्रत्यक्षात ते संमत झाले असते तर तीच महात्मा बसवेश्वरांना खरी मानवंदना ठरली असती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संतोष जिरेसाळ यांनी महात्मा बसवेश्वर महाराजांच्या कार्याचा आढावा घेतला. वीरशैव लिंगायत समाजाच्या मागणीचा मान राखून नगर परिषदेने या महत्त्वाच्या मार्गाला त्यांचे नाव दिल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे आभार मानले.

यावेळी नगरसेवक नंदकुमार शेळके, सुभाषराव बोरुडे, अमोल गर्जे, ड. प्रतिक खेडकर, बंडू बोरुडे, प्रतिक नांगरे, तसेच पुरुषोत्तम इजारे, सौ. रेणुका फुलशेटे, अभिजित गुजर, दत्तात्रय टेंभुरकर, सचिन फुटाणे, प्रथमेश नाकील, संतोष मेगुंडे, संजय होनमुने, शुभम इजारे, तन्मय फुटाणे आदी समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पुरुषोत्तम इजारे यांनी केले.

# अकोलेत रोटरी क्लबकडून ग्रामीण रुग्णालयाला 'शीत शव पेटी' सुपूर्त

## सीएसआर उपक्रमातून तालुक्यातील नागरिकांसाठी मोफत सुविधा उपलब्ध

**अकोले | वीरभूमी–** सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात नेहमीच पुढे असलेल्या रोटरी क्लब अकोले सेंट्रलच्या वतीने, तसेच रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या सीएसआर प्रकल्पांतर्गत सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून व मानवतावादी दृष्टिकोनातून 'शीत शव पेटी' (मॉर्च्युरी फ्रीझर बॉक्स) अकोले तालुक्यातील नागरिकांसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर शीत शव पेटी अकोले येथील ग्रामीण रुग्णालयाकडे सुपूर्त करण्यात आली.



या उपक्रमाची संकल्पना माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या पुढाकारातून साकार झाली. ओम साई राम स्टील, जालना या संस्थेच्या सीएसआर निधीतून ही शीत शव पेटी तालुक्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अकोले येथे झालेल्या लोकार्पण सोहळ्यात वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब मेहेत्रे व डॉ. मारुती भांडकोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही पेटी ग्रामीण रुग्णालयाकडे सुपूर्त करण्यात आली.

यावेळी माजी अध्यक्ष तथा विद्यमान डिस्ट्रिक्ट डायरेक्टर विद्याचंद्र सातपुते यांनी प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की, सन २०२४-२५ चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू यांच्या संकल्पनेतून ही शीत शव पेटी अकोले तालुक्यासाठी उपलब्ध झाली असून त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अनेक वेळा अंत्यविधीसाठी दूरवरून येणाऱ्या नातेवाईकांची वाट पाहावी लागत असे. मात्र, त्यावेळी मृतदेह ठेवण्यासाठी तालुक्यात शीत शव पेटीची सुविधा उपलब्ध नसल्याने अंत्यविधी लवकर उरकावा लागत असे. ही गरज ओळखून रोटरी क्लबने हा उपक्रम राबवून नागरिकांसाठी ही सुविधा मोफत उपलब्ध करून दिली आहे.

ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब मेहेत्रे यांनी रोटरी क्लब अकोलेने समाजासाठी दिलेल्या या सुविधेबद्दल आभार व्यक्त केले. ही शीत शव पेटी गरजेनुसार तालुक्यातील सर्व नागरिकांना सहज उपलब्ध करून दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी डॉ. मारुती भांडकोळी यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, सामाजिक जाणिवेतून रोटरी क्लबने अकोले तालुक्यातील एक मोठी गैरसोय दूर केल्याचे सांगितले. या उपक्रमाचे नागरिकांकडून निश्चितच स्वागत होईल, असे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी डॉ. सौ. ज्योती भांडकोळी, रोटरी क्लबचे अध्यक्ष अमोल देशमुख, अमोल वैद्य, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर तथा माजी अध्यक्ष विद्याचंद्र सातपुते, डॉ. रवींद्र डावरे, सचिन देशमुख, सचिन आवारी, सहसचिव विजय पावसे, माजी उपाध्यक्ष डॉ. जयसिंग कानवडे, सदस्य डॉ. राहुल वाळे, डॉ. सुशील बेणके, ज्ञानेश्वर आरोटे आदी उपस्थित होते.

# आदिवासी क्षेत्रातील माध्यमिक शिक्षकांना मुख्याध्यापकाची वेतनश्रेणी लागू करा

**अहिल्यानगर | वीरभूमी –** आदिवासी व नक्षलग्रस्त भागात प्रतिकूल परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या माध्यमिक शिक्षकांना 'एकस्तर पदोन्नती योजने'तंर्गत मुख्याध्यापक पदाची (ग्रेड पे ४८००) वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी 'शिक्षक भारती' संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले.

यावेळी पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, पारनेर तालुकाध्यक्ष दीपक फापाळे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नमूद केल्यानुसार, शासन निर्णय दि. ६/०८/२००२ नुसार आदिवासी भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदाच्या लगतच्या पदोन्नती पदाची वेतनश्रेणी मिळणे बंधनकारक आहे. माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत हे पद 'माध्यमिक मुख्याध्यापक' असून, त्यांना ग्रेड पे ४८०० (ड-१७) मिळणे अपेक्षित आहे. मात्र, सध्या अनेक ठिकाणी ही वेतनश्रेणी न देता केवळ लगतचा टप्पा दिला जात असून, ही बाब तांत्रिकदृष्ट्या चुकीची आणि अन्यायकारक असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

प्रशासनाने या कायदेशीर बाबींचा सकारात्मक विचार करून त्वरित आदेश निर्गमित करावेत, अन्यथा शिक्षक भारतीच्या वतीने तीव्र कायदेशीर लढा उभारला जाईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. या मागणीसाठी राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, रूपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, दिगंबर देसाई, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com